

कोल्हापूर : जागर पर्यावरण रक्षणाचा! कमला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी 'नो व्हेईकल डे' साजरा करत शनिवारी पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.
(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

# 'नो व्हेईकल डे'तून पर्यावरण रक्षणाचा संदेश

## कमला महाविद्यालयात उपक्रम : एक दिवस वाहनाशिवाय राहण्याचे आवाहन

सकाळ वृत्तसेवा 7/10/12

Youth Beats

कोल्हापूर, ता. ६ : सकाळी सव्वासातच्या सुमारास गाडीला किक मारली, की थेट महाविद्यालयाची पायरी चढण्यासाठी लगबग सुरू. त्यामुळे उशीर होण्याचा प्रश्न नाही; पण विनावाहन महाविद्यालयात लवकर पोचून प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न विद्यार्थिनींनी केला तर..? आश्चर्य वाटेल ना..? पण, हा प्रयत्न यशस्वीरीत्या केला तो कमला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी. त्यांनी 'नो व्हेईकल डे' साजरा करत पर्यावरण रक्षणाचा आज जागर घातला आणि प्रत्येकाने एक दिवस तरी वाहनाशिवाय राहण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहनही केले.

विद्यालयात विद्यार्थिनींची संख्या तेविसशे. सर्वसामान्य कुटुंबासह उच्च वर्गातील विद्यार्थिनीही महाविद्यालयात शिकतात. विद्यार्थिनींनी पर्यावरणातील प्रदूषणाचे गांभीर्य लक्षात घेता, नो व्हेईकल डे साजरा करण्याची कल्पना मांडली. महाविद्यालयीन सचिव नीलम पाटील हिने वर्गप्रतिनिधींची बैठक घेऊन हा डे साजरा करण्यास प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. त्यास प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनीही प्रोत्साहन दिले आणि आज तेही महाविद्यालयात वाहनाशिवाय आले. विद्यार्थिनीही आपल्या गाड्या घरीच ठेवून महाविद्यालयात आल्या. पर्यावरणाचे प्रदूषण कमी व्हावे, यासाठी वाहने घरात ठेवून प्राध्यापकही आले. उषाराजे हायस्कूल, डी. एड्. कॉलेजमधील विद्यार्थिनींनीही यात सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी पर्यावरण रक्षणासाठी राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक झाले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. ए. एम. साळुंखे यांनी महिन्यातून एकदा महाविद्यालयात नो व्हेईकल डे साजरा करण्यात येणार असल्याचे सांगितले.

Scanned by CamScanner